रायगड जिल्ह्यात वितरक व घाऊक विक्रेता नेमणे आहेत.
नामांकित टाटा कंपनीच्या कॉपर वॉटर, फ्रुट, ज्यूसेस, ग्लुकोज ड्रिंक इत्यादी उत्पादना साठी तालुका निहाय वितरक व घाऊक विक्रेता नेमणे आहेत.
-: संपर्क :-
विहा एन्टरप्रायजेस
9004563266
8888570393



दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित



दैनिक रायगड नगरी
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Web : www.raigadnagari.com /
Email : raigad.nagari@gmail.com



● वर्ष १७ वे ● अंक १७९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.२९ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com


## शासन आणि प्रशासनाने एकत्रित राहून कामे करणे अपेक्षित : ना.उदय सामंत



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**लोकप्रतिनिधी आणि शासकीय अधिकारी लोकसेवेसाठी बांधील आहेत. त्यामुळे शासन आणि प्रशासनाने एकत्रित राहून परस्पर समन्वयाने लोककल्याणकारी कामे करणे अपेक्षित आहे. या विचारधारेने सर्वांनी मिळून रायगड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास घडवून आणू या, असे आवाहन राज्याचे उद्योग मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे आज केले. रायगड जिल्ह्याचा जिल्हा वार्षिक नियोजन आराखडा तसेच इतर नियोजित विकासकामांबाबतची आढावा बैठक आज मलबार हिल येथील सह्याद्री शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते.**

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहत्रे, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुनील जाधव, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव आणि विविध शासकीय विभागांचे विभाग प्रमुख तसेच कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, टंचाईचे प्रस्ताव हे वेळेपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. जेणेकरून प्रत्यक्ष टंचाई उद्भवल्यास त्यावरील आवश्यक कार्यवाही योग्य पद्धतीने करता येऊ शकेल. नगरपालिकांनी मिनी फायर ब्रिगेड व्हॅन साठी प्रस्ताव सादर करावेत. जिल्ह्यात कारागृहांच्या सोयी सुविधांबाबत सविस्तर अहवाल सादर करावा. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांना कर्ज मंजुरी प्रक्रिया तात्काळ करण्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करावे.

शिक्षण विभागाविषयी आढावा घेताना प्राथमिक शाळांनी त्यांच्या सोयीसुविधा व अडचणींबाबतचा अहवाल सादर करावा. माध्यमिक शाळांमधील अतिरिक्त खोल्यांची माहिती सादर करावी. यामध्ये उत्कृष्ट कामकाज, उत्कृष्ट निकाल असणाऱ्या शाळांसाठी मॉडर्न लॅब ची निर्मिती करण्यात येईल, असे सांगून श्री.सामंत यांनी जिल्ह्यात कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही तात्काळ सुरू करावी, असेही सूचित केले.

बैठकीच्या सुरुवातीस जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी पालकमंत्री उदय सामंत यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहत्रे यांनी मंत्री महोदयांसमोर संगणकीय सादरीकरणाद्वारे जिल्हा वार्षिक नियोजन आराखडा सादर केला. या बैठकीच्या निमित्ताने जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांनी पालकमंत्री महोदयांना रायगड जिल्हा प्रशास-नाची परिवर्तन ही कार्यपुस्तिका भेट म्हणून दिली.

**पालकमंत्री श्री.सामंत यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना सूचित केले की, अधिकाऱ्यांनी पारदर्शकपणे जलद गतीने विकासकामे पूर्ण करावीत. सर्वांनी रायगड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय ठेवावे. ही ध्येयपूर्ती साधताना स्थानिक लोकप्रतिनिधींच्याही मताला महत्त्व द्यावे. अधिकाऱ्यांनीही लोकोपयोगी नावीन्यपूर्ण कामे सुचवावीत.**

**जिल्ह्यातील आरोग्य सोयीसुविधांचा आढावा घेताना पालकमंत्र्यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि जिल्हा सामान्य रुग्णालय तसेच क्रीडा या संदर्भातील आढावा बैठक स्वतंत्रपणे आयोजित करण्याचे संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले. त्याचबरोबर जिल्ह्यात कोविड-१९ अंतर्गत कोणकोणत्या सोयीसुविधा निर्माण केल्या गेल्या, त्यातील सीएसआर निधीतून कोणत्या व जिल्हा वार्षिक नियोजन मधून कोणत्या याबाबतचीही सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. येत्या काळात काही ग्रामीण रुग्णालयात मॉड्युलर ऑपरेशन थिएटर उभारण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. याबरोबरच जुन्या मात्र समाधानकारक स्थितीतील रुग्णवाहिका तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे वर्ग करता येतील का याविषयी चाचपणी करावी. लंपी आजाराविषयी गांभीर्याने लक्ष देवून जनावरांचे आवश्यक लसीकरण तात्काळ पूर्ण करावे. सेवा पंधरवडा अंतर्गत शासनाने निर्देशित केलेल्या सेवा जास्तीत जास्त नागरिकांना द्याव्यात, अशा सूचनाही त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.**

## कर्मवीर अण्णांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून कार्यरत रहा

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा विद्यार्थ्यांना मौलिक सल्ला



**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रत्येक विद्यार्थ्याने कर्मवीर अण्णांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून कार्यरत रहावे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उलवेनोड येथे आज केले. रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय सीबीएसइ व मराठी माध्यामीक विद्यालयात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५ व्या जयंतीचा कार्यक्रम बुधवारी संपन्न झाला. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या रांगोळी प्रदर्शनाचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याहस्ते उद्घाटन झाले.

रयत शिक्षण संस्थेच्या उलवा नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय सीबीएसई व मराठी माध्यमिक विद्यालयात कर्मवीर डॉक्टर भाऊराव पाटील यांच्या १३५ च्या जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या जयंतीच्या कार्यक्रमाचे औचित्य साधून 'कर्मवीर जयंती विशेष सप्ताह' निमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले तसेच इंदोर येथे आयोजीत केलेल्या राष्ट्रीय स्केटींग स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावलेल्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालयातील जतीन ठाकूर या विद्यार्थ्याचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्यावतीने वह्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमावेळी विद्यालयाचे चेअरमन परेश ठाकूर, रयतचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉक्टर एस. टी. गडदे, मराठी माध्यमचे चेअरमन शरद खारकर, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य निलेश खारकर, कविता खारकर, माजी उपसरपंच जगदीश खारकर, राजेश खारकर, मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, एस. एम. बल्लाळ, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रणीता गोळे यांच्यासह पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

## टेम्पोच्या धडकेत मायलेकीचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आयशर टेम्पोने दुचाकीला धडक दिल्याने या धडकेत २४ वर्षीय आई व दोन वर्षीय मुलीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तालुक्यातील रोहिंजण येथे राहणारे सिराज खान व त्याची पत्नी व मुलगी अदिबा असे स्कूटीने पनवेल-मुंब्रा रोडने प्रवास करत होते. या वेळी त्यांच्या पाठीमागून आलेल्या आयशर टेम्पोने त्यांच्या स्कूटीला जोराची धडक दिल्याने रेहाना खान व अदिबा यांचा जागीच मृत्यू झाला.

## धाटाव एमआयडीसीतील ७ कंपन्यांवर प्रदुषण मंडळाचा कारवाईचा इशारा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पावसाळ्यातील वातावरणाचा गैरफायदा घेत धाटाव एमआयडीसी क्षेत्रातील जल व वायू प्रदूषण करणाऱ्या ७ कंपन्यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडुन नोटीस बजावण्यात आल्या आहेत. पर्यावरण अटींचे उल्लंघन केल्यास कडक कारवाई करण्यात येईल असे स्पष्ट संकेत एमपीसीबी प्रशासनाने या कंपन्यांना दिले आहेत.

धाटाव एमआयडीसीतील काही कंपन्या पर्यावरणाचे नियम मोडीत वायू प्रदूषण करीत असल्याच्या अनेक तक्रारी आहेत. मागील पंढरवड्यात या भागात प्रदूषणाचा मोठ्या प्रमाणात त्रास नागरिकांना झाला. या जल, वायू प्रदूषणामुळे एमआयडीसी लगत असणाऱ्या धाटाव, रोठ, तलाघर, निवी, वरसे या गावांसह रोहा शहरा-तील नागरिक हैराण झाले आहेत. पावसाचा गैरफायदा घेत या कंपन्यानी वायू प्रदूषण करीत असल्याचे अनेकदा समोर आले आहे. या वायू प्रदूषणाने परिसरातील नागरिकांना उलट्या, मळमळणे, डोळे चूरचूरणे, श्वासाच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पर्यावरणाचे नियम पायदली तुडवून सरार्स प्रदूषण करणाऱ्या कंपन्या विरोधात येथील संतप्त नागरिकांनी थेट प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार देत दोषी कंपन्यांवर कारवाईची मागणी केलेली. या तक्रारिंची दखल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाने घेतली असून येथिल ७ कंपन्यांना नोटीस बजावल्या आहेत. रोहा परिसरात दररोज विषारी वायू प्रदूषण करीत असल्याच्या तक्रारी वाढल्यात वायू प्रदूषण रोखण्यासाठी नियंत्रण यंत्रणा कार्यान्वित ठेवा. प्रदूषण नियंत्रण यंत्रणेत त्रुटी आढल्यास व पर्यावरण अटींचे उल्लंघन केल्यास कारवाई केली जाईल असे स्पष्ट संकेत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक अधिकारी रा. सं. कामत यांनी संबंधित कंपन्याना दिले आहेत.

धाटाव येथिल काही कंपन्याकडुन पर्यावरणाचे नियम मोडले जात आहेत. याचा त्रास येथील राहिवाशांना सहन करावं लागत आहे. या विषयी तक्रार येताच आपण येथील ७ कंपन्याना नोटीस बजावल्या आहेत. दोषी कंपन्यावंर प्रदूषण मंडळ कारवाई करेल.

**- रा. सं. कामत, उप प्रादेशिक अधिकारी प्रदूषण नियंत्रण मंडळ**

## तानाजी सावंत यांचा पनवेल तालुका सकल मराठा समाजाकडून निषेध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मराठा समाजाबद्दल आक्षेपार्ह व चुकीचे वक्तव्य करणारे मुजोर आणि बेजबाबदार मंत्री तानाजी सावंत याचा पनवेल तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने आज श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक पनवेल येथे जाहीर निषेध करण्यात आला.

कामाऐवजी वक्तव्य आणि विधानांमुळे चर्चेत असणारे शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी उस्मानाबादमध्ये 'हिंदू गर्वगर्जना' संवाद यात्रेदरम्यान आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात भाष्य करताना मराठा समाजाबद्दल आक्षेपार्ह व चुकीचे वक्तव्य केले. त्यांच्या व्यक्तव्याचा पनवेल तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक पनवेल येथे जाहीर निषेध करण्यात आला.

यावेळी विनोद साबळे, गणेश कदू, मारुती महाडीक, सचिन भगत, विकास वारदे, यतीन देशमुख, पराग मोहिते, राजू नलावडे, रामेश्वर आंग्रे, संतोष जाधव, सदानंद शिर्के, राजेंद्र भगत, प्रविण जाधव, भरत पाटील, स्वप्निल काटकर, कुणाल कुरघोडे, भरत जाधव, ओंकार गावडे, सत्री टेमघरे, अल्पेश माने, दत्तात्रेय म्हामुळकर, सचिन जाधव, प्रताप उतेकर, लक्ष्मण थले यांच्यासह मराठा समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनच्या समिती सदस्यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांची घेतली भेट

**दै.रायगड नगरी । तळा**

तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनच्या व्यवस्थापकीय समिती सदस्यांनी आज उद्योग मंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन तळोजा एमआयडीसीच्या उद्योगांना आणखी वाढण्यास मदत करण्यासाठीच्या विविध मुद्यांवर चर्चा केली.

तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनने तळोजा एमआयडीसीमधील उद्योगांच्या हितासाठी अनेक मुद्दे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासमोर ठेवण्यात आले. त्यानुसार उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पुढील आठवड्यात संबंधित अधिकाऱ्यांसह तळोजा एमआयडीसीला भेट देण्याचे मान्य केले असून तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनने मांडलेल्या मुद्द्यांवर चर्चा करून उद्योगांना आणखी वाढण्यास मदत करण्यासाठी उद्योगांचे प्रश्न सोडवणार असल्याचे सांगितले.



यावेळी तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष सतीश (अण्णा) शेट्टी, उपाध्यक्ष बाबू जॉर्ज, सचिव बिनीत सालियन, महासचिव बिदुर भट्टाचार्जी, समिती सदस्य श्रीनाथ शेट्टी, सौरभ शहा, रितू बरमेचा आदी उपस्थित होते.

## १ नोव्हेंबरला शिंदे-ठाकरे वादावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

**नवीदिल्ली । वृत्तसंस्था**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यातील वादावर आता सर्वोच्च न्यायालयात नियमित सुनावण्या सुरु होणार आहेत. मंगळवारीच सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने निवडणूक आयोगाकडे खरी शिवसेना कोणाची, पक्षाचे निवडणूक चिन्ह कोणाचे यावर निर्णय घेण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला दिले.



आज शिंदे गटावरील अपात्रतेच्या कारवाईवरील याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणीची तारीख निश्चित केली आहे.

शिंदे ठाकरे गटातील वादाला २० जूनपासून सुरुवात झाली. विधानपरिषद निवडणुकीच्या रात्रीच एकनाथ शिंदे काही आमदारांना घेऊन सुरतेला निघून गेले. त्यानंतर आणखी काही आमदार शिंदेंना जाऊन मिळाले. दोन आमदार तिथून निसटले पण. त्यानंतर गुवाहाटीला काही आमदार, मंत्री जाऊन मिळाले. असे शिवसेनेचे आणि मित्र पक्ष, अपक्ष मिळून शिंदेंनी ५० आमदार आपल्या बाजुने केले. यानंतर राज्यात उद्धव ठाकरेंनी राजीनामा दिला. यानंतर राज्यात सत्तांतराचा खेळ सुरु झाला.

# पुरस्कारांचे विज्ञान

देशातील तरुण वैज्ञानिकांसाठी अत्यंत मानाचा जाणारा पुरस्कार म्हणजे भटनागर पुरस्कार. देशभर विखुरलेल्या राष्ट्रीय प्रयोगशाळांची शिखरसंस्था असलेल्या वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे (सीएसआयआर) पहिले महासंचालक आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ शांतिस्वरूप भटनागर यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार मिळाला म्हणजे आपल्या संशोधन कार्याची देशातील सर्वोच्च पातळीवरून दखल घेतली, असे तरुण (म्हणजे ४५ वर्षांच्या आतील) शास्त्रज्ञांना वाटते. २६ सप्टेंबर हा 'सीएसआयआर'चा वर्धापनदिन. त्या दिवशी भटनागर पुरस्कारांची घोषणा करण्याचा अनेक वर्षांचा प्रघात आहे. यंदा मात्र भटनागर पुरस्कार जाहीर न झाल्याने तो बंद तर केला नाही ना, अशी शंका उपस्थित केली गेली. इतक्या टोकाची शंका उपस्थित होण्याचे कारण दडले आहे, विज्ञान पुरस्कारांच्या फेररचनेच्या प्रस्तावात. १६ सप्टेंबर रोजी केंद्रीय गृह सचिव कुमार भल्ला यांच्या अध्यक्षतेखाली विविध विज्ञान विभागांचे सचिव आणि उच्चाधिकारी यांच्या बैठकीमुळे ही चर्चा सुरू आहे. या बैठकीतील इतिवृत्ताचा अनधिकृत तपशील समाज माध्यमात आला असून, त्यानुसार भटनागर पुरस्कारासह सुमारे शंभर विज्ञान पुरस्कार केंद्र सरकार बंद करणार आहे. यांपैकी बहुतेक पुरस्कार त्या-त्या विभागांद्वारे दिले जातात. या सर्व पुरस्कारांचे निकष, संशोधनाचा दर्जा, पुरस्काराची रक्कम, शिष्यवृत्ती वा पाठ्यवृत्तीचे स्वरूप आदी अनेक मुद्द्यांचा फेरविचार करायला हवा आणि पुरस्कारांची भाऊगर्दी कमी करावी, असा विचार या बैठकीत मांडला गेल्याची चर्चा आहे. भटनागर पुरस्कार आहे त्या स्वरूपात सुरू ठेवायचा, त्यात बदल करायचा की तो बंद करायचा याबाबत निर्णय झाला नसल्याचे सांगण्यात येते. या निमित्ताने पुरस्कारांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. संशोधनाच्या क्षेत्रात देशातील पुरस्कारांची संख्या दोनशेहून अधिक आहे. त्यांपैकी चार राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार आहेत, तर ५४ पुरस्कार शिष्यवृत्ती वा पाठ्यवृत्तीच्या स्वरूपाचे आहेत. ५६ पुरस्कार विभागांतर्गत दिले जातात, तर ९७ पुरस्कार विविध खासगी देणग्यांमधून दिले जातात. या पुरस्कारांमुळे संबंधित संशोधकांचा सन्मान होतो, त्यांच्या कार्याची दखल घेतली जाते आणि त्यांना प्रोत्साहन मिळते. मग ते थांबविले का जातात याचा विचार व्हायला हवा. पुरस्कार उदंड झाल्याने त्यांची परिणामकारकता संपते, हे खरेच आहे. त्याचबरोबर भारंभार पुरस्कारांमुळे निवडीचे निकष पातळ होतात. शिवाय, आप्तमित्रांची वर्णी लावण्याची सोय होते. परिणामी निवड प्रक्रिया अपारदर्शक होत जाते. सर्वच क्षेत्रांतील पुरस्कारांबाबत असे होते. त्यामुळे पुरस्कार किंवा पारितोषिकांचा मूळ हेतू कायम ठेवण्यासाठी त्यांच्या संख्येपासून निवड प्रक्रियेपर्यंत फेरविचार होणे गरजेचे आहे. विज्ञान पुरस्कारांबाबत विविध विभागांनी केलेल्या सादरीकरणांमध्ये काही कल्पक गोष्टीही पुढे आल्या. मोजके पुरस्कार देण्यापासून शिष्यवृत्ती वा पाठ्यवृत्ती वाढविण्याचा विचार रास्त म्हणावा लागेल. भटनागर पुरस्कार मानाचा असल्याने तो कायम ठेवायला हवा; तशी शक्यता असल्याचेही सांगितले जाते. नोबेल पारितोषिकाच्या धर्तीवर 'विज्ञानरत्न' नावाचा सर्वोच्च पुरस्कार सुरू करण्याचा या बैठकीत मांडलेला प्रस्ताव स्वागतार्ह आहे. पुरस्कारांच्या फेरविचाराबरोबर संशोधनाची आणि शोधनिबंधांची गुणवत्ता वाढविण्यासाठीही प्रयत्नांची आवश्यकता आहे. पुरस्कारांप्रमाणे शोधनिबंधांची निव्वळ संख्या वाढते आहे; परंतु पुढील संशोधनांना दिशा देणारे निबंध तुलनेने कमी आहेत, याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. विज्ञान पुरस्कारांच्या या निमित्ताने वास्तविक एकूणच देशांतर्गत पुरस्कारांचा फेरआढावा घ्यायला हवा. पुरस्कार आणि पारितोषिके निश्चितच महत्त्वाची आहेत. विविध क्षेत्रांतील प्रतिभावंतांची, अभ्यासकांची, संशोधकांची, कलाकारांची, साहित्यिकांची, उद्योजकांची; तसेच सार्वजनिक जीवनातील नेत्यांची, कार्यकर्त्यांची नोंद घेतलीच पाहिजे. यातून इतरांनाही प्रेरणा मिळते. त्यामुळे ती दिली जावीत यात शंका नाही; परंतु केंद्र आणि राज्य सरकारांकडून; तसेच सार्वजनिक क्षेत्रातील मान्यवर संस्थांकडून दिल्या जाणाऱ्या सर्व पुरस्कारांची आचारसंहिता समोर यावी. यांसाठीचे निकष स्पष्ट करण्याची आणि निवड प्रक्रिया पारदर्शक करण्याची गरज आहे. गेल्या काही वर्षांत पुरस्कारांची संख्या भौमितिक श्रेणीने वाढली असून, काहींनी त्याला धंदेवाईक स्वरूप दिले आहे. परिणामी पात्र नसणारेही कोणत्या ना कोणत्या पुरस्कारांनी सन्मानित होत आहेत. ज्यांचा खरोखरीच सन्मान करायला हवा अशी पात्र मंडळी यामुळे मागे राहतात. यामुळेच, पुरस्कारांची उंची वाढविण्यासाठी त्यांचा वैज्ञानिक फेरविचार करण्याची आणि त्यानुसार आचारसंहिता आखण्याची गरज आहे.

# पोलादपूरकरांचा महावितरण कार्यालयावर मोर्चा

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**




पोलादपूर महावितरण कार्यालयाच्या अनागोंदी कारभाराला वाचा फोडण्यासाठी पोलादपूरकरांचा मोर्चा सोमवारी सकाळी महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेना उपाध्यक्ष राज पार्टे यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षिय विद्युत ग्राहकांच्या सहभागाने वाजत-गाजत महावितरण कार्यालय पोलादपूर येथे धडकला. पोलादपूर तालुक्यातील महावितरणच्या ग्राहकहिताविरोधी कारभारामुळे पिडित ग्रहकांच्या विविध समस्यांची जाणीव राज पार्टे व सहकाऱ्यांनी महावितरणचे अभियंता सुनील सूद यांना करून देत खडसावले. मात्र, बदलीच्या प्रतिक्षेत असलेल्या या अभियंता सूद यांनी मुरलेल्या नोकरशहाप्रमाणे या मोर्चेकऱ्यांना सराईतपणे उडवाउडवीची उत्तरे शांत आवाजात दिल्याने आधीच्या आंदोलनाप्रमाणे हे आंदोलनही निष्फळ ठरेल की या मोर्चातून काही निष्पन्न होईल, या प्रतिक्षेत पोलादपूर तालुक्यातील विद्युत ग्राहक असल्याचे दिसून येत आहे.

मनसेचे कामगार सेना उपाध्यक्ष राज पार्टे यांनी गेल्या दोन वर्षांमध्ये पोलादपूर तालुक्यात आक्रमकपणे सरकारी कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या कार्यपध्दतीबाबत भुमिका घेत वाजवी लोकप्रियता मिळवली असून त्यांच्या आंदोलनांना पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण जनतेचा प्रतिसाद मिळत असल्याने जनतेकडून राज पार्टे यांच्याकडे समस्या मांडण्याची भुमिका दिसून येत आहे. पोलादपूर तालुक्यामध्ये विद्युत ग्राहकांच्या अनेक समस्या वाढीस लागल्या असून यामध्ये प्रामुख्याने मीटर रिडिंग न घेता येणारे भरसमाट लाईट बिल, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, जुने मीटर बदली करण्यात होणारी दिरंगाई, नवीन मीटरचे कनेक्शन देण्यासाठी होणारी दिरंगाई आदी अनेक प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम उपस्थितांनी केले. त्याचवेळी प्रीपेड मीटर बसेपर्यंत येणाऱ्या ३ महिन्यात लाईट बिल कमीत कमी यावे अन्यथा लाईट बिल भरण्यात येणार नाही असा इशारा देखील राज पार्टे यांनी मोर्चेकऱ्यांच्यावतीने दिला.

याप्रसंगी मनसेचे पोलादपूर शहर अध्यक्ष दर्पण दरेकर, शेतकरी कामगार पक्षाचे बोरावळे सरपंच वैभव चांदे, मनविसेचे प्रवीण पांडे, ओंकार मोहिरे तसेच अन्य सामाजिक कार्यकर्ते व विविध पक्षाचे राजकीय पदाधिकारी तसेच ग्राहक मोर्चामध्ये सहभागी झाले होते.

यावेळी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनीदेखील महावितरण अभियंत्यांकडे अनेक वेळा तक्रारी करूनही वेळेत त्यांना जाग आली नाही तर त्यांना वेगळ्या प्रकारे जागे करण्यात येईल असा इशारा दिला. महावितरण अधिकारी सुनील सूद यांनीदेखील मोर्चेकऱ्यांच्या मागणीला दाद देत भेडसावणाऱ्या समस्यांवर लवकरच तोडगा काढू तसेच नादुरुस्त मीटर बदलून तिथे येत्या ४ ते ५ महिन्यात प्रीपेड मीटर बसवू, असे प्रकारचे आश्वासन दिले. यावेळी अभियंता सूद यांनी तालुक्यातील २० टक्क्यांहून अधिक विद्युत मीटर नादुरूस्त असल्याची माहिती देऊन विद्युत ग्राहकांच्या रोषाला सामोरे जावे लागत असल्याबद्दल खेद व्यक्त केला. अभियंता सूद यांनी या आधीच्या आंदोलकांसोबत ज्याप्रमाणे शांत चित्ताने उत्तरे देत आंदोलनाची वेळ टाळून नेली, तो आविर्भाव यावेळीही सूद यांनी दाखवून संयमाने मोर्चा संपण्याची वाट बघितली. या मोर्चादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलादपूर पोलीसांनी कडक पोलीस बंदोबस्त तैनात ठेवला.

# सत्ता असो या नसो विकासाचे चक्र चालूच राहणार : खा. सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । तळा**



सत्ता असो या नसो विकासाचे चक्रचालुच रहाणार असे प्रतिपादन रायगडचे खा. सुनील तटकरे यांनी केले आहे. सोनसडे येथील दि. (२५)रोजी जलजिवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा व श्री काळभैरव मंदिर सभागृह उदघाटन झाल्यानंतर झालेल्या सभेत ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तळा तालुका अध्यक्ष नाना भौड, सामाजिक न्याय विभागरायगड सेलचे अध्यक्ष ॲड उत्तम जाधव, युवक अध्यक्ष नागेश लोखंडे, सरपंच माधुरी पारावे, तळा उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे ,तसेच तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी त्यांनी तळा तालुक्यातील जनता गेली २० वर्ष आपल्या ठामपणे पाठीशी राहील्याने मला या तालुक्याच्या विकासासाठी काम करण्याची संधी प्राप्त झाली हे आवर्जून सागींतले. या गावाच्याविकासासाठी आपण सदैव तत्पर असल्याचे सांगताना येथील महिलानी, गावातील युवकांनी उत्फुर्त आगळे वेगळे स्वागत करुन छोट्या मुलीनी पारंपारिक शिवगिते गाऊन उपस्थितांची मने जिंकली. गावाच्या ऐकीमुळे गावाच्या विकासात भर पडत आहे. त्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. गावातील महिलांनी वाजत गाजत लेझीम पथक खालु बाजाच्या तालावर मिरवणूक काढली. त्यानंतर नळ पाणी पुरवठा योजनेचे भुमिपुजन झाले. त्यानंतर श्री काळभैरव मंदिर सभागृह उद्घाटन करून मंदिरात दर्शनासाठी गेले. दीपप्रज्वलन करून शिव प्रतिमेला पुष्पहार घालून सभेला सुरवात झाली.

यावेळी ग्रामस्थांच्या वतीने खासदार सुनील तटकरे यानांशाल श्रीफळ पुष्पगुच्छ व शिव प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला.याप्रसंगी उपस्थितमान्यवरांचा ही सत्कार करण्यात आला. यानंतर श्रुती बोंबले आणि कलामंच आणि शिवगितांचा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाला अनेकांनी दाद दिली. संपुर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थ, महीला मंडळ, युवक मंडळ याचां चांगला प्रतिसाद मिळाला.

याप्रसंगी मुबंई मंडळ अध्यक्ष संतोष पवार यांनी आपल्या मनोगतात सुशिक्षित तरुणांच्या हाताला काम देऊन रोजगाराच्या संधी निर्माण करण्याची यावेळी मागणी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गावचे सचिव तथा पत्रकार कृष्णा भोसले यांनी करताना गावाच्या आजवरच्या विकासात तटकरे यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत काहीही कमी पडु दिले नाही. लोकांना संघटीत ठेवण्यात आपण यशस्वी झालात. हे आवर्जून सांगितले. त्यानंतर सुदंर कवितेतून त्यांनी तटकरे कुटुंबियांची प्रशंसा केली. परशुराम वरंडे यांनी सर्वांचे आभार मानले.

# पालीतील अनुज सरनाईकची सुवर्ण कामगिरी



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

१२ वी राज्यस्तरीय पिंच्याक सिल्याट स्पर्धा २२ ते २४ सप्टेंबर रोजी विभागीय क्रिडा संकुल, हिरावाडी, पंचवटी, नाशिक येथे संपन्न झाली. या स्पर्धेत ८५ ते ९० वजनी गटात फाईटमध्ये पालीतील अनुज सरनाईकने सुवर्ण पदक पटकावले आहे. तसेच ग्रुप इव्हेंट मध्ये सुद्धा सुवर्ण पदक मिळविले आहे. यामुळे रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

त्याचप्रमाणे ग्रुप इव्हेंट रेगू मध्ये अनुज सरनाईक, अंशुल कांबळे, वैभव काळे यांनी सांघिक सुवर्ण पदके पटकावले आहे. या स्पर्धेत एकूण ३६ जिल्हे आणि १० क्लब मधील ८०० खेळाडूंचा सहभाग होता. अनुजच्या या यशाबद्दल इंडियन पिंच्याक सिल्याट फेडरेशन चे अध्यक्ष किशोर येवले यांच्यासह अनेक मान्यवर व जिल्हा वासीयांना अनुजचे अभिनंदन केले.

# इच्छाशक्तीच्या बळावर अश्वचालकाने घेतली वकिलीची सनद

**दै.रायगड नगरी । माथेरान**


शिक्षणाची आवड जिद्द व चिकाटी असेल तर कोणतेही लक्ष साध्य करता येते याची प्रचिती माथेरान मधील अश्वचालक संतोष आखाडे यांच्या रूपाने आले असून वयाच्या ४० व्या वर्षी त्यांनी वकिलीची सनद घेतल्याने येथील तरुणांसाठी ते आदर्श ठरत आहे.



माथेरान मध्ये जेमतेम दहावीपर्यंत शिक्षण याची व्यवस्था आहे दहावीनंतर तुमची आर्थिक स्थिती चांगली असेल तर पुढील शिक्षण मोठ्या शहरात जाऊन घेता येते परंतु हातावरती पोट असणाऱ्यांची मात्र आर्थिक परिस्थितीमुळे पुढील शिक्षण घेण्याची मनोकामना पुरी होत नसते येथील अनेक विद्यार्थ्यांना त्याचा प्रत्यय आलेला आहे दहावीपर्यंत शिक्षण पूर्ण केल्यानंतर अनेक जण आपला पारंपारिक व्यवसाय करण्यात समाधान घेत असतात परंतु काही लोकांची जिद्द त्यांना स्वस्थ बसून देत नाही त्यातीलच एक उदाहरण म्हणजे येथे अश्वचालकाचा व्यवसाय करणारे संतोष गंगाराम आखाडे हे आहे अगदी लहानपणापासूनच आईचे छत्र डोक्यावरून हरविल्यानंतर अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले परंतु त्यानंतर घरची परिस्थिती हलकीची असल्याने पारंपरिक घोडे व्यवसाय करण्यास सुरुवात केली परंतु त्यांना असलेले शिक्षणाची आवड त्यांना गप्प बसून देत नव्हती त्यामुळेच त्यांनी थोडी हार्दिक स्थिती सुधारल्यानंतर पुन्हा एकदा आपले वकील बनण्याचे स्वप्न पूर्ण करण्याचा निर्णय घेतला व त्या दृष्टीने अभ्यास करण्यास सुरुवात केली व अखेर वयाच्या ४० व्या वर्षी त्यांनी वकिलीची सनद घेऊन सर्वांसाठी आदर्श निर्माण केला आहे केवळ जिद्दीच्या जोरावर आपण आपले ध्येय पूर्ण करू शकतो हे त्यांनी पुन्हा एकदा सिद्ध केले असून शिक्षणाला वयाची अट नसते हे आता त्यांच्या रूपाने माथेरान करांना समजले आहे.

# डुंगी या विमानतळ नदीपात्राने बाधित गावाचे पूर्नवसनाबाबत बैठक

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पनवेल तालुक्यातील मौजे डुंगी या विमानतळ नदी पत्राने बाधित गावाच्या पूर्नवसनाबाबत पनवेलचे उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके यांच्या अध्यक्षतेखाली उपविभागीय अधिकारी कार्यालय, पनवेल येथे बुधवारी बैठक संपन्न झाली. या बैठकीला उरणचे आमदार महेश बालदी प्रामुख्याने उपस्थित होते.

या बैठकीमध्ये मौजे डुंगी या विमानतळ नदीपात्राने बाधित गावाचे पूर्नवसनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी आ. महेश बालदी यांनी स्वतः जातीने लक्ष घालून डुंगी गावाच्या पात्रते संदर्भातील पुढील बैठक महाराष्ट्र शासनाच्या महसूल मंत्रांच्या दालनात घेण्यात येईल असे सांगितले. या बैठकीत डुंगी गावातील गावठाणात एकूण १२८ घरे असून यातील गावठाणामधील ५७ घरे पात्रतेनुसार, ७१ गावठाणाच्या बाहेर आहेत. यातील ४६ घरे पात्र आहेत तर ८२ घरे अपात्र आहेत या याबाबत चर्चा झाली. यावेळी आमदार महेश बादली, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब नाईक तसेच नायब तहसीलदार शेलार, ग्रुप ग्रामपंचायत पारगाव सरपंच अहिल्या नाईक, उपसरपंच निशा पाटील, सदस्य शिल्पा नाईक, सदस्य विश्वनाथ पाटील, गावातील पंच कमिटी विकास पाटील, श्रीधर पाटील, नितेश पाटील, दशरथ घरत, मधु नाईक, आदेश नाईक, तसेच सिडकोचे अधिकारी गुजराती, वसुले, तसेच मंडळ अधिकारी तलाठी क्षमा पवार, आदी मान्यवर उपस्थित होते



राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांची रायगड व रत्नागिरी जिल्हा पालकमंत्री पदी नियुक्ती झाल्याबद्दल भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रवीशेठ पाटील, आमदार महेश बालदी यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्रीनंद पटवर्धन व इतर.

# तळोजे औद्योगिक वसाहत क्षेत्रात होण्याऱ्या वाहतुकीच्या समस्या सोडवण्याची शिवसेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजे औद्योगिक वसाहत क्षेत्रात होण्याऱ्या अवजड वाहन पार्किंग समस्या, कारखानदारांची मनमानी, प्रमुख रस्त्यावर असलेले गतिरोधक नूतनीकरण,अवजड वाहने रस्त्यावर पार्क केल्यामुळे होणारी वाहतूक कोंडी, अपघात यामुळे होणारा नागरिकांना नाहक त्रास या संदर्भात तातडीने उपाययोजना करण्याची मागणी शिवसेनेतर्फे करण्यात आली आहे.

शिवसेना पनवेल तालुक्याच्या वतीने उपजिल्हाप्रमुख रामदासदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली पनवेल तालुकाप्रमुख विश्वास पेटकर याच्या मार्गदर्शनाखाली तळोजे पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सोनवणे, वाहतूक शाखा तळोजे वरिष्ठ पोलीस निरीक्षण महेश पाटील व तळोजे औद्योगिक वसाहतीचे उपकार्यकारी अभियंता गोगटे यांना शिवसेना पनवेल तालुक्यातर्फे वाहतुकीच्या समस्या सोडवण्यासाठी निवेदने देण्यात आली.

या वेळी पनवेल उपतालुका प्रमुख शांताराम कुंभारकर, वावंजे विभाग प्रमुख दत्तात्रेय फडके, वावंजे उपविभाग प्रमुख परशुराम भोपी, नितलसचे माजी सरपंच सुनिल काठे, माजी वावंजे शाखाप्रमुख परशुराम गायकर, युवासेना अधिकारी प्रमोद पाटील, विभागप्रमुख मारुती म्हात्रे, उपविभागीय प्रमुख दिलीप पाटील, देवीचापाडा शाखा प्रमुख विलास पाटील व वावंजे मा.शाखाप्रमुख परशुराम गायकर उपस्थित होते.



# शिंदे गटाने शिवसेनेचे अधिकृत चिन्ह वापरू नये

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर आता शिंदे विरुद्ध ठाकरे हा सत्ता संघर्ष सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन पोहचला आहे. त्यातच पनवेल मधील शिंदे गटातील काही पदाधिकारी हे शिवसेनेचे अधिकृत संकेत चिन्ह, निशाणी याचा वापर करीत आहेत. त्या बाबत शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख भरत पाटील यांनी आक्षेप घेतला आहे. त्यांनी ह्या बाबत एक प्रसिद्धी पत्रक जारी केले आहे.

बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या आणि पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या सर्वश्रुत असलेल्या शिवसेनेच्या अधिकृत चिन्हाचे काही बंडखोर पदाधिकारी हे त्यांच्या लेटर हेडवर वापर करीत आहे. त्याबाबत शिवसेना प्रेमी जनतेच्या मनात संभ्रम निर्माण होत असून हि बाब फौजदारी गुन्ह्यास पात्र आहे. तरी शिवसेनेच्या कोणत्याही संकेत चिन्हाचे अथवा निशाणीचा बेकायदेशीर वापर करू नये असा इशारा उपजिल्हाप्रमुख भरत पाटील यांनी दिला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः सुनील कृष्णाजी पोतदार यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ संपादक : राकेश दिलीप पितळे R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# एमजीएम रुग्णालय प्रशासनाचा भोंगळ कारभार, दुसऱ्याचा मृतदेह दिला ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मृत व्यक्तीचा मृतदेह दुसर्याच व्यक्तीच्या नातेवाईकांना दिल्याचा प्रकार कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात मंगळवारी २७ सप्टेंबर रोजी घडला आहे. या प्रकारामुळे एमजीएम रुग्णालय प्रशासनाचा भोंगळ कारभार समोर आला आहे. महत्वाचे म्हणजे या मृतदेहाचे अंत्यसंस्कार करण्यापूर्वी हा प्रकार लक्षात आल्याने पुढील अनर्थ टळला आहे. अलिबाग येथील पेझारी गावात नेण्यात आलेला मृतदेह परत मागवण्याची वेळ एमजीएम रुग्णालय प्रशासनावर आली. या धक्कादायक प्रकारामुळे एमजीएम रुग्णालय प्रशासनाच्या गलथान कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे.



अलिबाग – पेझारी येथे राहणारे रमाकांत पाटील यांना २६ सप्टेंबर रोजी कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केल्यानंतर पाटील यांचे शव रुग्णालयातील शीतगृहात ठेवण्यात आला. दरम्यान पनवेल तालुक्यातील दहिवली–सोमटणे येथील राम पाटील यांचा देखील मृतदेह शीतगृहात ठेवण्यात आला होता. रमाकांत पाटील यांच्या नातेवाईकांना सकाळी मृतदेह ताब्यात देतो असे सांगण्यात आले. त्यानुसार दुसर्या दिवशी मंगळवारी २७ सप्टेंबर रोजी सकाळी ७.३० ला पेझारी येथील रमाकांत पाटील यांचे नातेवाईक मृतदेह घेऊन जाण्यासाठी आले. त्यावेळी कर्मचार्याने दहिवली–सोमटणे येथील राम पाटील यांचा मृतदेह पेझारी येथील रमाकांत पाटील यांच्या नातेवाईकांच्या स्वाधीन केला. ते रमाकांत यांचा मृतदेह समजून रुग्णवाहिकेतून राम यांचा मृतदेह घरी घेऊन गेले. पेझारी येथे गेल्यानंतर मृतदेह समोर अनेकानी हंबरडा फोडला. यावेळी मृतदेह तिरडीवर नेण्याची तयारी सुरू झाली. त्याचवेळी एमजीएम रुग्णालयात राम पाटील यांचा मृतदेह घरी घेऊन जाण्यासाठी आलेल्या नातेवाईकांना शीतगृहात असलेला मृतदेह राम यांचा नसल्याचे लक्षात आल्याने राम यांच्या नातेवाईकांनी ही बाब रुग्णालय प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. पेझारी येथे घेऊन जाण्यात आलेल्या मृतदेहाच्या अंतिमसंस्काराची तयारी पूर्ण झालेली असतानाच मृतदेह बदली झाल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाकडून फोनद्वारे रमाकांत यांच्या नातेवाईकांना देण्यात आली. पंधरा मिनिटं जर रुग्णालयातून फोन आला नसता तर हा मृतदेह जळीत झाला असता. व त्यामुळे मोठा अनर्थ झाला असता.

दरम्यान, राम पाटील यांचा मृतदेह रमाकांत पाटील यांचा मृतदेह समजून पेझारी येथे घेऊन गेल्यांनतर तो त्याच रुग्णवाहिकेतून परत आणण्यात आला. व राम पाटील यांच्या नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला. या धक्कादायक प्रकारामुळे नातेवाईकांची चांगलीच धावपळ उडाली. त्यानंतर दुपारी १ च्या सुमारास रमाकांत पाटील यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यामुळे अशा प्रकारे दुसऱ्या व्यक्तीचा मृतदेह ताब्यात देऊन मृतदेहाची अदलाबदल केल्याने एमजीएम प्रशासनाचा भोंगळ कारभार समोर आला आहे. त्यामुळे प्रशासनावर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

**मृतदेह अदलाबदल प्रकरणात एमजीएम रुग्णालय प्रशासनाला विचारणा केली असता त्यांनी असा काहीच प्रकार रुग्णालयात घडला नसल्याचे सांगितले.**

**पेझारी येथे रुग्णवाहिका मृतदेह घरी सोडून कर्नाळा खिंडीत गेली होती. सगळं प्रकार लक्षात आल्यानंतर त्या रुग्णवाहिका चालकाला पुन्हा बोलावण्यात आले व त्यानंतर तो मृतदेह परत नेण्यात आला. व राम पाटील यांच्या नातेवाईकांना देण्यात आला.**

## उभ्या नादुरुस्त ट्रेलरला दुचाकीची धडक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रस्त्यावर उभ्या असलेल्या ना दुरुस्त ट्रेलरला एका दुचाकीची धडक बसून झालेल्या अपघातात सदर दुचाकीस्वार जखमी झाल्याची घटना आज सकाळी पनवेल जवळील गव्हाण फाटा येथे असलेल्या स्पीड ब्रेकर धाब्यासमोर घडली आहे.

उरण ते पळस्पा महामार्गावरील स्पीड ब्रेकर धाब्यासमोर समोरील रस्त्यावर एक नादुरुस्त ट्रेलर उभा होता. त्याच दरम्यान सेहेज आंबेतकर (वय २१), राहणार चारफाटा उरण हि तिच्या तरुणी तिच्या ताब्यात असलेल्या दुचाकीवरून जात असताना तिने सदर उभ्या ट्रेलरला धडक दिल्याने झालेल्या अपघातात ती स्वतः जखमी झाल्याने तिला तातडीने मनपा वाशी रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. या अपघाताची माहिती मिळताच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिंदे व त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## दहिवली गावातील समस्या सोडवण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगर परिषद क्षेत्रात येणाऱ्या दहिवली भागातील नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, त्यामुळे तेथील रहिवाशी त्रस्त आहेत या परिसरातील दहिवली गाव परिसर विचार मंथ या सदस्यांनी कर्जत नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली व त्यांना निवेदन सादर केले.



कर्जत नगर परिषदेच्या सभागृहामध्ये याबाबत एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी व्यासपीठावर उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, मुख्याधिकारी वैभव गारवे, नगरसेविका प्राची डेरवणकर, विशाखा जिनगरे, नगरसेवक विवेक दांडेकर, राहुल डाळिंबकर, संकेत भासे आणि नगरपरिषद कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

दहीवली गावात पाणी अनियमित येते तसेच येणारे पाणी गढूळ येते त्यामुळे गावातील भगिनीं अत्यंत त्रस्त झाल्या असून प्रशासनातील कारभारावर अत्यंत नाराज आहेत, गावासाठी पाण्याची साठवण टाकी नाही त्यामुळे ग्रामस्थांचे हाल होत आहेत गावासाठी स्वतंत्र पाण्याची टाकी बांधावी, दहीवली गावात कचऱ्याची समस्या जाणवत आहे याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे, विशेषता लहान व मोठ्या पुलाजवळ नदीच्या पात्रात कचरा टाकला जातो तिथून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीला सामोरे जावे लागत आहे, गावात भटकी कुत्री मोठ्या प्रमाणात वाढली आहेत, उल्हास नदीच्या पात्रात सांडपाणी सोडल्याने नदी प्रदूषित झाली आहे यावर प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी, दहीवली घाटावर स्वच्छता करावी व शेड बांधावी, स्मशानभूमी मध्ये स्वच्छता करावी व अंत्यविधीच्या वेळेला बसण्याची सोय करावी, गावातील सार्वजनिक शौचालय यांची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक आहे असे निवेदन मुख्याधिकारी वैभव गारवे यांना दिले.व चर्चा केली या चर्चेत विकास चित्ते, शशांक शेट्टी,प्रविण गांगल,सुनिल जाधव, प्रदीप गोगटे, संजय मोहिते यांनी भाग घेतला व समस्यां कथन केल्या, अतुल पवार यांनी आभार मानले. मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी नगरपरिषद प्रशासनाच्या अधिकारात येणाऱ्या समस्यां त्वरित सोडण्याचा मी प्रयत्न करेन असे सांगितले.

मा.सोनवलकर साहेब यांचे कोर्टात

**अर्जदारातर्फे वकील : ॲड.आशिष पनवेलकर**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात

फौ.चौ.अर्ज क्र.१०५१/२०२२

ने.ता.०२/११/२०२२

श्रीमती.मेनका प्रवीण शिरसाठ<br>
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी<br>
रा.रुम नं.२०६, सेक्टर १२, मुमताज<br>
कॉम्प्लेक्स, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कामोठे विभाग<br>
जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी<br>
पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई कै. वासंती परशुराम मेहेंदळे यांचा मृत्यू दि.०८/०३/२०२० रोजी राहत्या घरी रुम नं.२०६, सेक्टर १२, मुमताज कॉम्प्लेक्स, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू झाला होता.

अर्जदार यांची आई कै.वासंती परशुराम मेहंदळे यांची मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या कोर्टात अर्ज केला आहे.

सदरहू कै.वासंती परशुराम मेहंदळे या वर नमूद ठिकाणी मृत्यू झाले आहे या संदर्भात कोणालाही काही सांगायचे असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पनवेल येथील मे.न्यायालयात स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहून हरकत घ्यावी. तसे न केल्यास न्यायालय अर्जदार यांच्याकडे योग्य तो पुरावा घेवून योग्य आदेश करेल.

आज दि.२७/०९/२०२२ रोजी सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**<br>
**क.लिपीक**<br>
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**<br>
**सहा.अधिक्षक**<br>
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

### PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given that, I am investigating title of the scheduled property belonging to Mrs. Shirley O'Leary, on behalf of my client who intends to purchase the schedule property from the said Mrs. Shirley O'Leary, being the owner thereof.

All persons/entities having any right, title, claim, benefit, demand, interest or objection in respect of the under mentioned scheduled Property or any portion or part thereof including claim/objection as and by way of Sale, Exchange, Mortgage, Gift, Lien, Trust, Lease, Possession, Inheritance, Easement, License or any other claim/objection of whatsoever nature, are hereby required to make the same known in writing, along with documentary evidence to the undersigned at the address mention below within 7 days from the publication hereof. In the event if no claim/objection is received within such time, it shall be considered that, either no such claim or objection exists or that, if any such claim or objection exists, the same have be waived, relinquished or abandoned.

**SCHEDULE OF PROPERTY**

Flat No. B-101, B – Wing, on the First Floor, in the building known as 'Akanksha CHS Ltd.', situated at Bori Pakhadi, Taluka Uran, Dist. Raigad, within the limits of Uran Municipal Corporation admeasuring 11160 sq.ft. i.e. 103.68 sq.mtrs. (Built – up) area.

Place: Panvel<br>
Date: 28/09/2022

SD/-<br>
**PAUL LEGAL ASSOCIATES**<br>
Office No.301, 3rd Floor, Om Sai Building, Plot No.101/3, Swami Nityanand Road, Panvel, Navi Mumbai – 410206.<br>
Email: info@paullegalassociates.com

## श्रीवर्धन पोलीस ठाण्यात जागतिक माहिती अधिकार दिन साजरा

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

आज २८ सप्टेंबर, हा दिवस जागतिक माहिती अधिकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवसाचे औचित्य साधून आज सकाळी ११ वाजता श्रीवर्धन पोलीस ठाण्यामध्ये देखील जागतिक माहिती अधिकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश रसेडे यांनी उपस्थितांचे स्वागत करून माहितीच्या अधिकाराबाबत माहिती दिली.



या कार्यक्रमासाठी श्रीवर्धन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व पोलीस पाटील उपस्थित होते. त्याचप्रमाणे ज्वेलर्स असोसिएशनचे शांतीलाल जैन व पत्रकार देखील उपस्थित होते. यावेळी श्रीवर्धनमधील ज्येष्ठ पत्रकार आनंद जोशी यांनी माहितीच्या अधिकारा बद्दल विशेष माहिती उपस्थितांसमोर सादर केली. माहितीचा अधिकार भारतामध्ये जरी २००५ सली लागू करण्यात आला असला तरी स्वीडन या देशामध्ये तो १७५५ साली लागू करण्यात आला होता. भारतामध्ये माहितीचा अधिकार लागू करण्यासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी देशभरात चळवळ उभी केली होती.

माहितीच्या अधिकारामुळे ज्या गोष्टींची माहिती मागण्याचा अधिकार नागरिकांना आहे, त्याचप्रमाणे काही गोष्टी अशा आहेत की ज्यामुळे पोलीस तपासात काही व्यत्यय येऊ शकत असेल तर तशी माहिती नाकारण्याचा अधिकार आहे. त्याचप्रमाणे देशाचे ऐक्य व अंतर्गत सुरक्षा याला कोणत्याही प्रकारे धोका पोहोचेल अशा प्रकारची माहिती नाकारणे हे देखील यामध्ये नमूद केलेले आहे. या कार्यक्रमाला पोलिस निरीक्षक संजय पाटील हे देखील उपस्थित होते. त्यांनी देखील माहितीच्या अधिकाराबाबत उपस्थितांना माहिती दिली.

### जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : उमरोली, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमिनीची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : उमरोली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. / हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| उमरोली | ७४/१ | ०–७३–१० | ४.२५ |
| | पोटखराबा | ०–०३–४० | |

सदर जमीन मिळकतीमधील एकूण क्षेत्रापैकी ०–७३–१० इतके क्षेत्र श्री.देवचंद नारायण पाटील यांचे मालकीचे व ताबेकब्जातील आहे. सदर हे.आर.पॉ. ०–१६–०० इतके क्षेत्राची जमीन श्री.देवचंद नारायण पाटील यांचेकडून आमचे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करणेची ठरविली आहे.

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार–मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल<br>
दिनांक : २८/०९/२०२२

**सही/–**<br>
**ॲड.शिल्पा कचेर पाटील**<br>
**पत्ता : वळवली गाव, विठ्ठल मंदिराजवळ, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड**<br>
**मो.नं.९९३०८२२३३७**

Gunnal Judge

Adv.Manjit Kaur

### PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (SENIOR DIVISION) AT PANVEL

MISC. APPLICATION No.503/22<br>
Exh : 7/D<br>
N.D. 30/09/2022

1) SUGEESH SUGATHAN<br>
2) GEETHA SUGATHAN PANDIYATH<br>
All are having correspondence address at EDEEN TOWER CHS LTD., C2-303, DATTA MANDIR ROAD, NEAR HINJEWADI FLYOVER, WAKAD, PUNE, CITY PUNE MAHARASHTRA-411057 — Applicants

V/s

NIL — Opponent

Let it be known to all concerned that deceased late Mr.SUGATHAN SANKARAN PANDIYATH therefore the applicants have filed the Misc application No.503/2022 application for heirship certificate under the provision of Bombay regulation act VIII of 1827

**SCHEDULE OF IMMOVABLE PROPERTY**<br>
**100% share in**<br>
**KENDIRYA VIHAR CO-OPERATIVE SOCIETY Ltd., at B-13/03, SECTOR-11, KHARGHAR, NAVI MUMBAI**

If any person/s have any objection title, claim share, or any kind of interest in the said property, which is more particularly described in the schedule hereinabove, is hereby invtied. Then may appear in person or through their advocate, objecting this application in the court of civil judge S.D. at Panvel, Dist-Raigad, Maharashtra. If no one appears and objects for the same within 30 days from the date of publiction of this notice then this Hon'ble court will proceed to pass the necessary order thereon which please note.

28/09/2022<br>
Panvel

**सही/–**<br>
**क.लिपीक**<br>
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**<br>
**सहा.अधिक्षक**<br>
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील जयंती सोहळा आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रयत शिक्षण संस्थेचे, महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल महाराष्ट्राचे शिक्षण महर्षी व रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३५ वा जयंती सोहळा'' ३० सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास अध्यक्ष म्हणून रयत शिक्षण संस्थेचे मैनेजिंग कौन्सिलचे सदस्य रामशेठ ठाकूर असणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. व्ही.एस. शिवणकर, रायगड विभागीय सल्लागार समितीचे चेअरमन आमदार बाळाराम पाटील हे उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यास रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य जे.एम.म्हात्रे,अरुण भगत, महेंद्र घरत आदिमान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार आहे.

### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : शिवकर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकत / जमीन ही आमचे अशिल हे कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : शिवकर, तालुका : पनवेल, जिल्हा :रायगड**

| गाव | भोगवटादाराचे नांव | गट क्र.व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| शिवकर | श्री.धर्मा काथोर तुपे<br>श्री.कृष्णा काथोर तुपे<br>श्री.नामदेव काथोर तुपे<br>श्रीमती.बयोवबाई विश्वनाथ भोईर<br>मंजुला मनोहर ढवळे<br>वनिता गणेश भोईर<br>कै.इंदुबाई काशिनाथ भोपी मयत तर्फे वारस<br>वैशाली श्रावण पालेकर<br>मिथुन काशिनाथ भोपी<br>सोनाली काशिनाथ भोपी | २४९ | ०–४५–८०<br>पोटखराबा ०–०२–८०<br>एकूण क्षेत्र ०–४८–६० | ९.३१ |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लीज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार–मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यपासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल<br>
दिनांक : २६/०९/२०२२

**सही/–**<br>
**ॲड.महेश भगत**<br>
**शॉप नं.२२, कल्पतरु कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.५१, सेक्टर नं.९, खांदा कॉलनी, नवीन पनवेल–पश्चिम, ता.पनवेल, जि.रायगड**<br>
**मो.नं.८१०८३९५७६८**

# संक्षिप्त...

## शॉक लागून झालेल्या दुर्घटनेशी संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गणेश विसर्जनाच्या वेळी शॉक लागून झालेल्या दुर्घटनेशी संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई करावी तसेच पनवेल महानगरपालिकेत विदयुत अभियंत्याची नेमणूक करावी अशी मागणी शेतकरी कामगार पक्ष पनवेल महानगरपालिका क्षेत्राचे कार्याध्यक्ष महादेव वाघमारे यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गणेश विसर्जनाच्या दिवशी कोळीवाडा विसर्जन घाटावर दहा जणांना विजेचा जोरदार धक्का लागला होता. दहा जणांपैकी आठ जणांना रुग्णालयात दाखल करावे लागले तर दोघांना अत्यावश्यक विभागात (खउण) मध्ये ठेवून उपचार देण्याची गरज भासली. पनवेल महानगरपालिकेने नेमलेल्या ठेकेदाराच्या विद्युत जनरेटर मधील बिघाडामुळे हि दुर्दैवी घटना घडली. या घटनेला जबाबदार असणाऱ्या ठेकेदारावर महानगरपालिकेने कारवाई करताना पालिकेच्या विद्युत अभियंत्यावर मात्र कोणतीच कारवाई करण्यात आली नाही धक्कादायक बाब म्हणजे पालिकेच्या विद्युत अभियंत्याने विदयुत विभागाचे कोणतेही शिक्षण घेत–लेले नाही. आपल्या मर्जीतील अधिकारी म्हणून पालिकेचे वरिष्ठ अधिकारी या अभियंत्याला पाठीशी घालत असून या घटनेत गणेशभक्तांच्या जीवाशी खेळ खेळून त्यांच्या जीवितास हानी पोहचविण्यास जबाबदार असलेल्या या विदयुत अभियंत्यांवर कारवाई करावी तसेच भविष्यात अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी पनवेल महानगरपालिका क्षेत्रात विदयुत अभियंत्याची नेमणूक करावी अशी मागणी महादेव वाघमारे यांनी केली आहे.

## पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्म क्रमांक ७वर एक व्यक्ती जखमी अवस्थेत आढळला. त्याचा पनवेल उपजिल्हा रुग्णालय येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला. याबाबतची माहिती पनवेल स्टेशन यांनी पोलीस ठाण्यात दिली असून या व्यक्तीच्या नातेवाइकांचा शोध पोलीस घेत आहेत.

मयत व्यक्ती ही ६९ वर्षांची असून तिची उंची पाच फूट सात इंच, अंगाने मजबूत, रंग गहूवर्ण, चेहरा गोल, नाक सरळ, केस काळे पांढरे असून पुढील बाजूस टक्कल आहे. अंगात शर्ट व निळी पॅन्ट आहे. या व्यक्तीविषयी माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे ०२२–२७४६७१२२ किंवा ९८७०३१७२७२ येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.


**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# कालव्याच्या पाणी प्रश्नावर प्रशासनाने घेतली दखल

**दै.रायगड नगरी । रोहा**



रोहा तालुक्यातील कालव्यांना गेली १० वर्षे पाणि नाही, याबाबत ग्रामस्थांनी उठाव करून अलटीमेटम देताच सर्वच प्रशासनाने याची दखल घेतली. बुधवारी कालव्याच्या पाण्याबाबत तहसीलदार रोहा, पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता यांना ग्रामस्थांनी निवेदन दिले. कालव्याच्या स्थितीचा आढावा घेत ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांजवळ चर्चा केली. कालव्याच्या पाण्याबाबत पाटबंधारेच्या अधिकाऱ्यांसमवेत तातडीने बैठक घेण्याचे थेट आश्वासन रोहा तहसीलदार कविता जाधव यांनी शेतकऱ्यांना दिले आहे.

रोहा तालुक्यातील कुंडलिका नदीच्या उजव्या व डाव्या तिरावरील कालव्यांना गेली १० वर्षे पाणि सोडले जात नाही, शेतकरी वर्गाला पाणी नाही म्हणून वाशी, लांढर, बोरघर, तळाघर, निवी हद्दीतील शेतीकरी, ग्रामस्थ पाण्यासाठी आक्रमक झाले आहेत. याबत समन्वय समितीच्या बैठकीत ग्रामस्थ पाण्यासाठी प्रचंड संतप्त झाले. येत्या पंधरा दिवसात संबंधीत प्रशासनाने पाणी सोडण्याबाबत लेखी आश्वासन न दिल्यास मोठे आंदोलन उभे करू असा अल्टिमेट येथिल ग्रामस्थांनी दिल्यावर अखेर सर्वच प्रशासनाने पाणि प्रश्नाची दखल घेतली. बुधवारी कालव्याच्या पाण्याबाबत तहसीलदार रोहा कविता जाधव, रायगड पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता दिपेश्री राजभोज यांना विभागीय ग्रामस्थांनी निवेदन दिले. कालव्याच्या स्थितीचा आढावा घेत ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांजवळ चर्चा केली.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र जाधव, संदेश मोरे, विठ्ठल मोरे, सरपंच मनोज कळंबे, तुकाराम भगत, राकेश बामगुडे, सागर भगत, रवी मोरे, किशोर कांबळे, सुरेश साळवी, संजय भगत व विभागातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कालव्याच्या पाण्याबाबत पाटबंधारेच्या अधिकाऱ्यांसमवेत तातडीने बैठक घेण्याचे थेट आश्वासन तहसीलदार कविता जाधव यांनी दिले.

तर तुम्हा ग्रामस्थांची पाण्यासाठीची आक्रमकता समजू शकते, कालव्याच्या कामांबाबत लगेचच आढावा घेतला जाईल, असे कालव्याला पाणी सोडण्याबाबत कार्यवाही करण्याचे स्पष्ट सुतोवाच रायगड पाटबंधारे विभागाच्या मुख्य कार्यकारी अभियंता दीपेश्री राजभोज यांनी दिल्याने विभागीय ग्रामस्थांनी तुर्तास समाधान व्यक्त केले. दरम्यान, कालव्याला पाणी सोडण्याचे पंधरा दिवसात लेखी. आश्वासन न दिल्यास प्रशासनाविरोधात विभागातील शेकडो ग्रामस्थ, महिला आंदोलन उभे करतील, असा थेट पुनर्रउच्चार प्रशासनातील या अधिकाऱ्यांसमोर ग्रामस्थांनी केल्याने कालव्याचा पाणी प्रश्न तातडीने सुटणार की पाणी पेटणार ? याची आज दिवसभर तालुक्यात चर्चा सुरू आहे.

## बच्चे कंपनीसाठी पर्वणी ; तळा शहरात बाल उद्यानाची निर्मिती



**दै.रायगड नगरी । तळा**

कोरोना महामारीने गेले दोन वर्ष शाळा बंद होत्या. नुकत्याच सर्व शाळा पुन्हा सुरु झाल्या आहेत. मात्र, कोरोना आणि लॉकडाऊनने लहान मुलांना घरात बंदिस्त करून ठेवले. मग मुलेही प्रचंड वैतागली. त्यात तळा शहरात एकही उद्यान नसल्याने त्यांच्या खेळावर मर्यादा आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर ‘लहानपण देगा देवा मुंगी साखरेचा मेवा’, या पंक्तीप्रमाणे तळा नगरपंचायतीने शहरात श्री.चंडिका देवी परिसरात बाल उद्यानाची निर्मिती केली आहे.या उद्यानामध्ये परिसरातील लहान मुलांनी मोठया संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांनी केले आहे.

तळा नगर पंचायत हद्दीत बच्चे कंपनीसाठी छोटेसे बाल उद्यान असावे अशी मागणी सातत्याने पुढे येत होती. लहान मुलांना खेळण्यासाठी कोणतीही जागा नगरपंचायत हद्दीत उपलब्ध करून न दिल्याने लहान मुले आणि पालकांमध्येही नाराजीचा सूर उमटत होता.काही महिन्यांपूर्वी पत्रकार विराज टिळक तळा नगरपंचायत विरोधात उपोषणास बसले होते त्यात देखील त्यांनी बच्चे कंपनीसाठी बाल उद्यानाची मागणी केली होती.उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांनी यासंदर्भात मुख्याधिकारी डॉक्टर धीरज चव्हाण यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला त्याचप्रमाणे श्री.चंडिका माता मंदिर देवस्थानचे अध्यक्ष महेंद्र कजबजे आणि सर्व सदस्य, कमिटी मेम्बर यांनी बाल उद्यानासाठी चंडिका परिसरातील जागा उपलब्ध करून दिली त्यामुळे हे शक्य झाले असल्याचे उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांनी सांगून सर्वांचे आभार मानले लहान मुलांना खेळण्यासाठी विविध वस्तू नगरपंचायतीने उपलब्ध करून दिल्या (दी. २७) रोजी नगराध्यक्षा अस्मिता भोरावकर यांच्या शुभहस्ते श्री.फळ वाढवून याचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी नगराध्यक्षा सौ. अस्मिता भोरावकर,उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, मुख्याधिकारी डॉक्टर धीरज चव्हाण,नगरसेवक मंगेश शिगवण,अविनाश रविंद्र पिसाळ, नरेश सुर्वे,प्रकाश गायकवाड,भास्कर गोळे,सिराज खाचे, ॲड.चेतन चव्हाण,नगरसेविका सौ.अर्चना विजय तांबे, कुमारी यामिनी जनार्दन मेहत्तर आदी मान्यवर उपस्थित होते.

## तुर्भे गावातील विस्तारित गावठाणाबाबत तहसीलदारांना निवेदन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील तुर्भे ग्रामस्थांना भेडसावत असलेल्या गावठाण क्षेत्राचा कायमस्वरुपी मार्ग काढावा यासाठी तहसीलदार पनवेल यांना निवेदन सादर करण्यात आले.



मौजे तुर्भे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नं.८१/५२ एकूण क्षेत्रफळ १.६४.० चौ.मीटर मध्ये गावठाण तुर्भे अशी नोंद तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत १९८८ ला मंजूरी देण्यात आली आहे. सदर मिळकतीचा गावठाण वापरासाठी रितसर वाटप होणेबाबत त्याचप्रमाणे गुरुचरण नोंद असलेली सर्व्हे नं.८९ मधील ३.७४.०० हेक्टर आर चौ.मी. पैकी १.६०.०० हे.आर.चौ.मी. अंदाजे ४ एकर एवढे वाढीव क्षेत्र विस्तारित गावठाणासाठी मंजूर होवून मिळावे याकरिता तुर्भे ग्रामस्थांच्या वतीने निवेदन पनवेल तहसीलदार यांना देण्यात आले. सदरचे निवेदन मा.जिल्हाधिकारी यांना पाठवून तहसीलदार यांनी आवश्यक ते सहकार्य करावे, अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.

यावेळी गावदेवी ग्रामविकास सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष वामन भोईर, उपाध्यक्ष भास्कर तरे, सचिव नारायण पाटील, सहसचिव तुळशीराम पाटील, खजिनदार सोमनाथ भोईर, सहखजिनदार हरिश्चंद्र भोईर, मंडळाचे सर्व सदस्य तसेच ॲड.शशिकांत काळु म्हात्रे, ॲड.शांताराम बेडेकर हे उपस्थित होते.

## पनवेल शहर जिल्हा महिला काँग्रेसच्या वतीने वुमन हेल्पलाईन नंबरचे लॉन्चिंग

**दै.रायगड नगरी । पनवेल**



आपल्या अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या अध्यक्षा मा. नेट्टा डिसुझा मॅडम ह्यांनी वुमन हेल्पलाईन नंबर दिला आहे याच अनुषंगाने महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस अध्यक्षा संध्याताई सव्वालाखे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली त्याचे लॉन्चिंग आपण पनवेल येथे पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष अभिजित पांडुरंग पाटील व पनवेल शहर जिल्हा युवक अध्यक्ष हेमराज नाथा म्हात्रे ; पनवेल जिल्हा सरचिटणीस आणि सहकार सेलचे उपाध्यक्ष मल्लीनाथ गायकवाड ; म.प्र.म.कॉ. सरचिटणीस चंद्रकला नायडू मॅडम यांच्या हस्ते काँग्रेस भवन पनवेल येथे संपन्न झाला.

या वेळी सर्व विभागीय अध्यक्षा, महिला पदाधिकारी, बचत गट च्या पदाधिकारी या जास्तीत जास्त संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होत्या. नगरसेविका मंजुळा कातकरी, पनवेल तालुका अध्यक्षा योगिता नाईक, सोशल मिडिया अध्यक्षा अनुपमा चुढ़ा, उपाध्यक्षा प्रेमा आप्पाची, सायरा कूनी, ब्लँक अध्यक्षा खारघर सोनिया सोहोटा, सरचिटणीस निता शेणॉय, विनया पाटील, अंजूम तेरवा, नसरिम मॅडम, रेश्मा खान, अलका ठाकूर आणि महिला कार्यकर्ते उपस्तीत राहुन कार्यक्रम संपन्न झाला.

## टेम्पोला अज्ञात वाहनाची धडक १ ठार २ जखमी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण पनवेल राष्ट्रीय महामार्गावर मंगळवारी रात्री २ वाजता जासई येथे बंद पडलेल्या टेम्पोला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. या अपघातात एका तरु–णाचा मृत्यू झाला आहे. तर दोघे जखमी झाले आहेत. उरण पोलीस या घटनेचा अधिक तपास करीत आहेत.

मंगळवारी एक टेम्पो उरण पनवेल मार्गावरील जासई च्या अशोक लेलंड शोरूम जवळ बंद पडला होता. हा टेम्पो रस्त्यातून बाजूला करण्यासाठी दुसऱ्या टेम्पो ला दोरी बांधून खेचण्याचे काम सुरू होते. त्याचवेळी या मार्गावरून भरधाव येणाऱ्या अज्ञात वाहनाने टेम्पोला जोराची धडक दिली. यावेळी टेम्पो खेचण्यासाठी मदत करीत असलेल्या तिघांना या वाहनाची धडक लागल्याने त्यातील २० वर्षीय परवेझ हरसाल अहमद शेख याचा अपघात मृत्यू झाला आहे. तर दोघेजण जखमी झाले आहेत. या अपघाताचा उरण पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## माथेरान न.प. प्रशासकांनी कर्मचाऱ्याचा वाढदिवस केला साजरा

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नगरपालिकेमध्ये स्वच्छता विभागात कार्यरत असलेले अन्सार महा–पुळे यांचा वाढदिवस आज नगरपालिका कार्यालयामध्ये माथेरानच्या प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे (शिंदे ) यांनी नगरपरिषदेच्या कार्यालयात सर्व कर्मचाऱ्यांसह मोठ्या उत्साहात साजरा करून एक नवीन पायंडा पाडला आहे.



माथेरान नगरपालिकेमध्ये स्वच्छता विभागांमध्ये मुकादम या पदावरती कार्यरत असलेले श्री अन्सार भाई शेख हे नगरपालिकेमध्ये मागील वीस वर्षापासून कार्यरत आहे मालिका कार्यालयातील कार्यक्षम अधिकारी म्हणून त्यांच्याकडे माथेरानमध्ये मोठ्या आदराने पाहिले जाते स्वच्छता विभागात जरी ते कार्यरत असले तरी मात्र नागरिकांच्या कोणत्याही समस्या सोडवण्यासाठी ते नेहमी तत्पर असल्याने माथेरान मधील नागरिकांमध्ये ते प्रसिद्ध आहेत. माथेरान मध्ये नव्यानेच आलेल्या मुख्याधिकारी यांनाही त्याची प्रचिती आली असल्याचे त्यांनी याप्रसंगी बोलून दाखविले कोणत्याही दिवशी म्हणजे सुट्टीच्या दिवशीही नगरपालिका कार्यालयामध्ये अति महत्त्वाच्या कामासाठी सर्वप्रथम उपलब्ध असलेले आन्सर भाई हे नगरपालिकेचे एकमेव कर्मचारी आहे. त्यामुळेच आज त्यांचा वाढदिवस त्यांच्या सर्व कार्यालयीन कर्मचारी सहकाऱ्यांसह मुख्याधिकारी मॅडम यांनी नगरपालिका सभागृहांमध्ये केक कापून आन्सर भाई यांचा वाढदिवस साजरा केला. यावेळी नगरपालिका कर्मचारी कार्यालय अधिक्षक प्रवीण सुर्वे, लेखापाल अंकुश इचके, स्वच्छता निरीक्षक अभिमन्यू एलवंडे, ज्ञानेश्वर सदगीर, राजेश रांजणे, उमेश मोरे, लक्ष्मण दरवडा, रामदास धोत्रे, व इतर सर्व कर्मचारी उपस्थित होते यावेळी माथेरानच्या मुख्याधिकारी सुरेखा भणगे (शिंदे) यांनी त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## नवसाला पावणारी भिसेगावची श्री अंबे भवानी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत रेल्वे स्थानका पासून अगदी दोन – तीन मिनिटांच्या अंतरावर असलेल्या भिसेगाव मध्ये श्री अंबे भवानी मातेचे मंदिर आहे. नवसाला पावणारी जागृत देवस्थान अशी या स्थळाची प्रचीती आहे.

या देवी बद्दल उपलब्ध असलेली माहिती अशी की, कर्जत नगरपरिषद हद्दीत असलेले भिसेगाव हे गाव भिसे खिंडीच्या पायथ्याशी आहे. पूर्वी या ठिकाणी खूप जंगल होते. व्यापारी वर्ग व्यापारासाठी मुंबई – पुण्याकडे जातांना याच खिंडीच्या मार्गाने जात. हे व्यापारी खिंडी जवळ असणाऱ्या विहिरीजवळ रात्री मुक्काम करून सकाळी पुढील प्रवासाला निघत. डोंगर माथ्यावर आदिवासी लोकांची वस्ती होती.



एके दिवशी एका गुजराथी व्यापाऱ्याला मुक्कामाला असतांना स्वप्न पडले. स्वप्नात देवीने दर्शन दिले. ’मी या विहिरीजवळ असलेल्या वारुळात आहे. मला त्यातून बाहेर काढ. माझ्या सोबतीला एक काळा नाग आहे. तो तुम्हाला काही करणार नाही. या स्वप्नाकडे लक्ष न देता तो व्यापारी तेथून पुढे निघून गेला. काही दिवसांनी पुन्हा या ठिकाणी तो व्यापारी मुक्कामास आला असता त्याला तसाच दृष्टांत झाला. हा सर्व वृत्तांत त्याने आपल्या व्यापारी मित्रांना सांगितला. या सर्व व्यापारी वर्गाने मिळून स्वप्न शोधण्याचे ठरविले. त्यांनी डोंगर माथ्यावर राहणार्या आदिवासींना मदतीला बोलून घेतले. सार्वजण वारूळ फोडण्यासाठी जमले असता त्या वारुळातून काळा नाग बाहेर आला व कुणालाही काहीही न करता बाहेर निघून गेला. त्यानंतर आदिवासी लोकांनी वारूळ फोडले. तो काय आश्चर्य खरोखर देवीची सुंदर रेखीव मूर्ती त्यातून बाहेर पडली. ती मूर्ती पाहून सर्वांना आनंद झाला. आदिवासी व व्यापारी यांनी सावली म्हणून देवीच्या डोक्यावर छप्पर तयार केले. तेंव्हा पासून व्यापारी येता जाताना देवीची पूजा करून दर्शन घेऊन आपापल्या कामाला जात असत.

ही देवी कोणती ? असा प्रश्न कुतुहलापोटी लोकांमध्ये निर्माण होऊ लागला. तेंव्हा ज्या आदिवासी माणसाने वारुळास प्रथम हात लावला त्याच्या स्वप्नात जाऊन देवीने सांगितले की, मी गुजराथ येथील अबुच्या पहाडावरील श्री अंबे भवानी आहे. तेंव्हा पासून या देवीला श्री अंबे भवानी माता असे लोक म्हणू लागले आणि भक्ती भावाने तिच्या भजनी पूजनी लागले. ग्रामस्थांनी एकत्र येऊन मंदिराचा जीर्णोद्धार केला असून आता मोठा सभा मंडप उभारून गोर गरीब लोकांच्या शुभ कार्याची व्यवस्था केली आहे.

# नागरिकांना होणाऱ्या अपुऱ्या व अनियमित पाणी पुरवठ्याबद्दल सिडको टाळे बंद आंदोलन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडकोनिर्मित नागरी वसाहत असलेल्या नवीन पनवेल व खांदा कॉलनी येथील रहिवासी नागरिकांना होणार्या अपुर्या व अनियमित पाणीपुरवठ्याबद्दल ११ ऑक्टोबरला भाजपच्यावतीने आमदार प्रशांत ठाकूर व माजी नगराध्यक्ष सुनील घरत यांच्या नेतृत्वाखाली सिडकोच्या नवीन पनवेलमधील कार्यालयात टाळे बंद आंदोलन करण्यात येणार आहे. त्या संदर्भात आज भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे यांनी सिडकोला निवेदन दिले आहे.

नवीन पनवेल येथील सिडको कार्यालयात सिडकोचे सहाय्यक अभियंता सागर जगदाळे यांना निवेदन देताना भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुनिल घरत, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, समीर ठाकूर, माजी नगरसेविका सुशीला घरत, राजेश्री वावेकर, शहर सरचिटणीस अमरिश मोकल, प्रभाग अध्यक्ष विजय म्हात्रे, जितेंद्र वाघमारे, शिवाजी भगत, लक्ष्मी चव्हाण, शारदा माने, रुचिता वागमनकर आदी उपस्थित होते.



सिडकोला देण्यात आलेल्या या निवेदनात म्हंटले आहे कि, सिडकोच्या माध्यमातून नवीन पनवेल आणि खांदा कॉलनी अशा दोन नागरी वसाहती ४० वर्षांपूर्वी उभ्या करण्यात आल्या आहेत. त्या वेळी सिडकोने तेव्हाची लोकसंख्या विचारात घेऊन पाण्याच्या टाक्यांची व्यवस्था केली होती, तर अनेक ठिकाणी पाणी साठवणुकीसाठी काहीही व्यवस्था केली नव्हती. मागील एवढ्या ४० वर्षांच्या कालावधीत किमान चार पटींनी लोकसंख्या वाढली, मात्र पाण्याचे साठवण टाक्या आजही तेवठयाच आहेत. शिवाय पाण्याच्या पाईपलाईन जीर्ण व खराब झाल्या असून नवीन पाईपलाईन कुठेही टाकण्यात आलेली नाही याउपर ज्या धोकादायक झाल्या त्या पाडण्यात आल्या, पण तेथे नव्याने टाक्या उभारण्यात आल्या नाहीत. यामुळे अनेक ठिकाणी पाण्याची फार मोठी कमतरता भासत आहे. परिणामी नागरिकांना अतिशय कमी दाबाने पाणीपुरवठा होतोच, मात्र काही ठिकाणी तिसर्या ते चौथ्या माळ्यापर्यंत पाणी पोहचत नाही. त्यामुळे नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. नवीन पनवेल व खांदा कॉलनी विभागासाठी पाण्याची आवश्यकता पाहता पाण्याच्या वाढीव स्रोतवाढीसाठी सिडकोकडून काय प्रयत्न केले गेले याची माहिती नागरिकांना, महापालिकेला मिळत नाही.

अपुरा व अनियमित पाणीपुरवठा होत असल्यामुळे सिडकोबाबत नागरिकांच्या मनात तीव्र असंतोषाची भावना निर्माण झालेली आहे. पाण्याच्या या मूलभूत समस्येबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वेळोवेळी सिडकोसोबत चर्चा, पत्रव्यवहार व आंदोलने करूनसुद्धा याची सिडकोने दखल घेतलेली नाही. उलटपक्षी होणार्या मोठमोठ्या बांधकामांना आणि टॉवर्सना नवीन पाण्याचे कनेक्शन देऊन इतर ठिकाणी कमी पाणी दिले जाते. ही बाब अतिशय खेदजनक व गंभीर आहे.आणि वास्तविक या सर्व परिस्थितीला सिडकोच जबाबदार आहे, मात्र असे असताना या सर्व बाबींकडे सिडको दुर्लक्ष करीत असून अशा बेजबाबदार व भोंगळ कारभाराचा निषेध करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर व माजी नगराध्यक्ष सुनील घरत यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार दिनांक ११ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता सिडकोच्या नवीन पनवेल कार्यालय येथे टाळे बंद आंदोलन करण्यात येणार असून त्या वेळी कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सिडको प्रशासनाची राहील, असेही या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.